# <u>जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.</u>

## <u>जा ही र नि वि दा.</u>

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व जळगांव मुख्यालयी जिल्हा न्यायालयाचे अखत्यारीत असलेल्या न्यायालयांमधील खालील नमुद कार्यालयीन स्टील कपाटे दुरुस्ती व रंगकाम करणा–या पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व जळगांव मुख्यालयी जिल्हा न्यायालयाचे अखत्यारीत असलेल्या न्यायालयांमधील दैनंदिन वापरात असलेली बरीचशी कपाटे ही जुनी व नादुरुस्त झालेली असल्याने त्यांना दुरुस्त करणे व जुन्या कपाटांना रंग दयावयाचा आहे. तरी याकामी ज्या पुरवठाकारांना/दुरुस्तीकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफयात म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या <u>नावाने पाकिटावर "कार्यालयीन स्टील कपाटे दुरुस्ती व रंगकाम"</u> असे नमुद करुन पाकीटे म.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव यांचे कक्ष क्र.101 मध्ये दिनांक 27/04/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 28/04/2026 रोजी म.जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांचे समक्ष त्यांच्या निजी कक्षात उघडले जातील.

<u>कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे कार्यालयीन स्टील कपाटे दुरुस्त करणे व रंगकाम करणे खालील प्रमाणे उधारीवर करावयाची आहेत.</u>

| दुरुस्त व रंगकाम करावयाची कपाटे |
|---|
| लोखंडी कपाट **Steel Cupboard (Major)** **(Powder Coated)** अंदाजे 110 कपाटे |

## <u>सर्वसाधारण अटी.</u>

1. दरपत्रक स्विकृत केल्यावर आदेश दिल्यानंतर सदरचे काम त्वरीत सुरु करावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा, नसल्यास स्विकाराला जाणार नाही.

2. सदरचे साहित्य कार्यालयीन वेळेत जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव तसेच जळगांव मुख्यालयी असलेल्याज़िल्हा व सत्र न्यायालयाचे अधिपत्याखालील सर्व न्यायालयात करावे लागेल.

3. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

4. सदरील कामकाज संपल्यानंतर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

5. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते. त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बीलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल.

6. उपरोक्त कपाटांची दुरुस्ती व रंगकाम अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

7. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा—यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

8. दरपत्रकातील दर दिनांक 31/12/2026 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात केला जाईल, त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

9. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

10. कपाटांना रंगकाम केल्यानंतर त्या कपाटांवर पुर्वी असलेले नांव कपाटाच्या वरच्या भागाच्या उजव्या कोप—यात या कार्यालयाकडुन पुरविण्यात येणारे नाव व नंबर सदरील कपाटावर रंगाने टाकुन मिळावी.

VSKankar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

म.जा.क.रोखशाखा/२३६४/2026
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक: 18/04/2026.

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालय, जळगांव संकेतस्थळावर